# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## परिपत्रक

विषय :-शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील पारंपारिक पदवी अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्ष मंजूर प्रवेश क्षमतेच्या ४०% व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी १०% ज्यादा विद्यार्थी मागणी प्रस्तावाबाबत.

संदर्भ- या कार्यालयाचे संलग्नता/टी-२६३ दि.२१/०६/२०२५ रोजीचे परिपत्रक

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषय व संदर्भास अनुसरून शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता पारंपारिक पदवी अभ्यासक्रमांच्या ४०% पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी १०% जादा विद्यार्थी मागणी करणे बाबतचे प्रस्ताव सादर करण्याबाबत कळविण्यात आले होत. यानुसार बहुतांश महाविद्यालयांकडून सदरचे प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. सदर प्रस्तावांबाबत विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार खालीलप्रमाणे कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

पदवी अभ्यासक्रम

१. नजिकच्या सर्व महाविद्यालयाचे ना-हरकत प्रमाणपत्र
२. संबंधित अभ्यासक्रमारिता कार्यभारानुसार आवश्यक शिक्षक उपलब्ध असल्याबाबतची कागदपत्रे व संलग्नता टी-१ विभागाकडून मान्यता घेणार असल्याचे हमीपत्र अथवा घेतलेली मान्यता
३. पायाभूत सुविधा महाविद्यालयामध्ये उपलब्ध असल्याचे हमीपत्र
४. शासकीय अनुदान मागणी करणार नसल्याबाबत १०० रू. चा मुद्रांक
५. मागील वर्षी ४०% विद्यार्थी मागणी करून प्रवेशित केले असल्यास अतिरिक्त कार्यभारासाठी नेमलेल्या शिक्षकांची माहिती.
६. ४०% वाढीव विद्यार्थ्यांची ७५% हजेरी भरण्यासाठी केलेले नियोजन व त्याबाबतचे हमीपत्र
७. महाविद्यालय विकास समिती माहिती सादर केली आहे काय
८. शैक्षणिक वर्ष २०२०-२१ ते २०२४-२५ या कालावधीतील सर्व संलग्नीकरण शुल्क पावत्या
९. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता विद्यापीठाचे इतर शुल्क पावत्या (अग्रणी/अश्वमेध/विद्याथी कल्याण इ.)
१०. ज्या अभ्यासक्रमासाठी १०% जादा विद्यार्थी मागणी केले आहेत त्या अभ्यासक्रमाची गत तीन वर्षातील प्रवेशित विद्यार्थ्यांची माहिती.

पदव्युत्तर अभ्यासक्रम

१. नजिकच्या सर्व महाविद्यालयाचे ना-हरकत प्रमाणपत्र
२. संबंधित अभ्यासक्रमारिता कार्यभारानुसार आवश्यक शिक्षक उपलब्ध असल्याबाबतची कागदपत्रे व संलग्नता टी-१ विभागाकडून मान्यता घेणार असल्याचे हमीपत्र अथवा घेतलेली मान्यता
३. पायाभूत सुविधा महाविद्यालयामध्ये उपलब्ध असल्याचे हमीपत्र
४. शासकीय अनुदान मागणी करणार नसल्याबाबत १०० रू. चा मुद्रांक
५. मागील वर्षी १०% विद्यार्थी मागणी करून प्रवेशित केले असल्यास अतिरिक्त कार्यभारासाठी नेमलेल्या शिक्षकांची माहिती.
६. १०% वाढीव विद्यार्थ्यांची ७५% हजेरी भरण्यासाठी केलेले नियोजन व त्याबाबतचे हमीपत्र
७. महाविद्यालय विकास समिती माहिती सादर केली आहे काय
८. शैक्षणिक वर्ष २०२०-२१ ते २०२४-२५ या कालावधीतील सर्व संलग्नीकरण शुल्क पावत्या

८. **शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता विद्यापीठाचे इतर शुल्क पावत्या (अग्रणी/अश्वमेध/विद्याथी कल्याण इ.)**
९. **ज्या पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी १०% जादा विद्यार्थी मागणी केले आहेत त्या अभ्यासक्रमाची गत तीन वर्षातील प्रवेशित विद्यार्थ्यांची माहिती.**

सबब, ज्या महाविद्यालयांनी पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी अनुकमे ४०% व १०% जादा विद्यार्थी प्रवेशासाठी प्रस्ताव सादर केले आहेत अशा महाविद्यालयांना उपरोक्त मुद्येनिहाय पुरावा कागदपत्रे प्रस्तावास जोडून पुर्तता करण्यात यावी. तदनंतरच याबाबतची पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घेण्यात यावी.

**कळावे.**

**आदेशान्वये**
(signature)
**(डॉ. पी. एस. पांडव)**
**उपकुलसचिव**
**संलग्नता टी-२ विभाग**

**संदर्भ क्र. संलग्नता/टी-२/** No 408
**दि.** 19 JUL 2025
**प्रति,**
**मा. प्राचार्य,**
**सर्व संलग्नित कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालये,**
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.**